| | | |
|---|---|---|
| | दाखल तारीख | ३०.०३.२०२४ |
| | नोंदणी तारीख | ०१.०४.२०२४ |
| | निर्णय तारीख | १७.०३.२०२६ |
| | कालावधी | ०१ **व.** ११ **म.** १८ **दि.** |
| **MHSN040003152024** | **निशाणी क्र.** | **१५** |

## इस्लामपूर जि. सांगली येथील अतिरिक्त सत्र न्यायालयात

(पिठासीन अधिकारी : श्री. देविदास हरी केळूसकर)

## फौजदारी अपील क्र.१०/२०२४

१. सौ. आरजू मोहसीन शेख **अपीलार्थी**
वय– ३४ वर्षे, धंदा– घरकाम

२. कु. नेहान मोहसीन शेख
वय– १२ वर्षे, धंदा– शिक्षण
नं. २ करीता अ.पा.क. नं. १
दोघे रा. व्दारा– अजमुद्दीन नबीलाल मुलाणी
रा. वाटेगांव, ता. वाळवा, जि. सांगली.

**विरुध्द**

१. मोहसीन निजामुद्दीन शेख **सामनेवाला**
वय– ४० वर्षे, धंदा– नोकरी
रा. इसबावी, आण्णा अपार्टमेंट,
फलॅट नं. २०२, पंढरपूर,
ता. पंढरपूर, जि. सोलापूर.

२. निजामुद्दीन वलिबा शेख
वय– ६३ वर्षे, धंदा–

DEVIDAS HARI KELUSKAR

Digitally signed by DEVIDAS HARI KELUSKAR
Date: 2026.03.17 17:06:37 +0530

३. सौ. नसिराबी निजामुद्दीन शेख
वय– ५६ वर्षे, धंदा– घरकाम
नं. २ व ३ रा. साकत, ता. बार्शी, जि. सोलापर

----------------------------------------

अपीलार्थीतर्फे वकील श्री. एफ. आर. मगदुम
सामनेवाला तर्फे वकील श्री. एस. पी. पाटील

----------------------------------------

## न्यायनिर्णय

(अधिघोषीत दि. १७.०३.२०२६)

१. प्रस्तुतचे फौजदारी अपील अपीलार्थी यांनी प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, इस्लामपूर न्यायालय क्र. १ यांनी फौजदारी किरकोळ अर्ज क्र.४००/२०२३ मधील निशाणी ५ वर पारीत केलेल्या दिनांक २९.०२.२०२४ रोजीच्या आदेशाविरुध्द दाखल केला आहे.

२. प्रस्तुतचा अर्ज अपीलार्थी क्र.१ हिने घरगुती हिंसाचार प्रतिबंधक कायदा कलम २३ नुसार विविध मागण्यांकरीता खालील न्यायालयात दाखल केला होता. तिच्या कथनानुसार अर्जदार क्र. १ व जाबदार क्र. १ हे पती–पत्नी असून उभयतांचा विवाह दि. ०१/११/२०११ रोजी मुस्लीम धर्मशास्त्र व रितीरिवाजानुसार राधिका मंगल कार्यालय पाचवड फाटा कराड येथे झाला होता. लग्नानंतर अर्जदार क्र. १ ह्या जाबदार यांचे घरी साकत, ता.बार्शी, जि. सोलापूर येथे नांदावयास गेल्या असता पहिल्या दिवशीच जाबदार क्र. १ यांनी अर्जदार क्र. १ हिला खुलासा केला की, उभयतांचे लग्न हे जाबदार क्र. १ यांच्या मनाविरुध्द झाले आहे. जाबदार क्र. १ ने अर्जदार क्र. १ यांना

सांगितले होते की, त्याचे पूर्वीपासून आत्तीची मुलगी रिजवाना शेख या मुलीबरोबर प्रेम संबंध होते. जाबदार क्र. ३ ही अर्जदार क्र. १ हिला ''तुझ्यापेक्षा लाख पटीने सुंदर, सडपातळ तसेच पैसेवाल्या मुली माझे मुलाला आले ल्या होत्या व त्या हुंडा देणेस तयार होत्या'' असे टोमणे मारत होती. त्या कारणावरुन अर्जदार क्र. १ हिचा मानसिक छळ करुन कौटुंबिक हिंसाचार करुन क्रुरपणाची वागणूक देत होते. अर्जदार क्र. १ हिने कंटाळू न सदरची बाब पुन्हा तिचे वडीलांना सांगितली. त्यावेळी, अर्जदार क्र. १ हिचे आई–वडील साकत येथे गेले होते. त्यावेळी, अर्जदार क्र. १ हिचे आई–वडीलांनी जाबदार क्र. १ ते ३ यांची भेट घेऊन मुलीला व्यवस्थित सांभाळून घेणेची विनंती केली. परंतु, जाबदार यांनी अर्जदार क्र. १ हिचे आई–वडीलांना अपमानित करुन, ''इथून पुढे आमचे घरी यायचे नाही'' असे सांगितले. तरी देखील सर्व त्रास सहन करुन अर्जदार क्र. १ ह्या जाबदार क्र. १ बरोबर प्रामाणिकपणे संसार करीत होत्या. परंतु, जाबदार हे वेगवेगळया कारणांनी अर्जदार हिस त्रास देत होते. सुरुवातीला तिला मुल होत नाही या कारणावरुन त्रास देत होते व अर्जदार क्र. २ याचा जन्म झाल्यानंतर काही दिवसांनी अर्जदारच्या चारित्र्यावर संशय घेऊन त्रास देण्यास सुरुवात केली. तसेच फलॅट घेण्यासाठी तिच्या माहेरच्याकडून रक्कम आणण्यासाठी तगादा लावला. अर्जदार हिने तिच्या वडीलांकडून रुपये ४,००,०००/– फलॅट खरेदीसाठी आणली होती व अर्जदार हिने तिच्याकडील रुपये ५,००,०००/– चे दागिने विकले. पंढरपूर येथील फलॅट दोघांच्या नावावर फलॅट घेल्यानंतर जाबदार क्र. २ व ३ यांनी सदर फलॅट दोघांच्या नावावरुन घेतल्यामुळे भांडण करु लागले. तसेच

DEVIDAS HARI KELUSKAR
Digitally signed by DEVIDAS HARI KELUSKAR
Date: 2026.03.17 17:06:45 +0530

जाबदार क्र. १ याचे त्याच्या आत्याच्या मुलीशी अनैतिक संबंध होते व जाबदार क्र. १ हा अर्जदार हिस घटस्फोट देण्यासाठी त्रास देवू लागला. त्यामुळे दिनांक २२/०३/२०२३ रोजी अर्जदार हि तिच्या माहेरी आई–वडीलांकडे राहत आहे. सदर अर्जाद्वारे तिने स्वतःसाठी व अर्जदार क्र. २ याच्याकरिता अंतरिम पोटगी मिळणेसाठी विनंती केली आहे. जाबदार क्र. १ हे पंढरपूर येथील कर्मयोगी पॉलीटेक्नीक कॉलेज शेळवे येथे प्राध्यापक म्हणून लग्नापूर्वीपासून आजअखेर नोकरीस आहेत. त्याला दरमहा रक्कम रु. ५०,०००/– इतका पगार आहे. तसेच, जाबदार क्र. १ यांचे नांवे साकत येथे २ एकर शेत जमीन आहे. तसेच, जाबदार क्र.२ यांचे नांवे ४ ते ५ एकर शेतजमीन आहे. सदर शेतजमीनीत जाबदार क्र. १ ते ३ यांना वार्षिक खर्च वजा जाता रक्कम रु. ५,००,०००/– इतके उत्पन्न मिळत आहे. त्यांच्या मालकीच्या चारचाकी व दुचाकी गाड्या आहेत. तसेच, बँका, पतसंस्था या ठिकाणी जाबदार क्र. १ यांचे नांवे ठेवी, डिपॉझीट, पॉलीसी इत्यादी स्थावर जंगम मालमत्ता आहे. अशाप्रकारे, जाबदार क्र.१ हा श्रीमंत इसम आहे. त्यामुळे, जाबदार क्र. १ यांची अर्जदार क्र. १ हिस दरमहा रक्कम रु.१०,०००/– अक्षरी व अर्जदार क्र. २ यांना दरमहा रक्कम रु. ५,०००/– इतकी अंतरिम पोटगी देणेची आर्थिक ऐपत आहे. त्याप्रमाणे अंतरिम पोटगीची मागणी केली आहे.

३. जाबदार क्र. १ ते ३ तर्फे निशाणी १४ वर म्हणणे दाखल करुन अर्जातील कथने नाकारली. त्यांनी नातेसंबंध मान्य केले. त्यांच्या कथनानुसार अर्जदार क्र.१ ही साकत, ता. बार्शी येथे लग्नानंतर फक्त १५ दिवस जाबदार

क्र.१ ते ३ सोबत राहत होती. त्यानंतर, अर्जदार क्र.१ ही जाबदार क्र.१ बरोबर मौजे पंढरपूर येथे कामधंद्यानिमित्त राहण्यास गेल्या. तिथे अर्जदार क्र.१ हिला स्मार्ट प्री प्रायमरी स्कुल येथे टिचर म्हणुन नोकरीस लावले. परंतु, अर्जदार क्र.१ ने त्या ठिकाणी ४ महिने नोकरी केली. त्यानंतर, त्यांना पंढरपूर येथील व्हिजन ॲग्रो या कंपनीमध्ये नोकरी लावली. परंतु, त्याठिकाणीही काही महिने नोकरी करुन अर्जदार क्र.१ ने तेथील नोकरी सोडली. त्यानंतर, पंढरपूर येथे कर्मयोगी पब्लिक स्कूल येथे शिक्षक म्हणून तसेच, त्यानंतर कॉम्बॅट ॲग्रो, पंढरपूर येथे नोकरीस संधी देण्यात आली. परंतु, त्याही ठिकाणची नोकरी सोडून दिली. जाबदारांचे पुढे असे कथन आहे की, सन २०१९ लॉकडाऊन पूर्वी अर्जदार क्र.१ ही जाबदार क्र.१ सोबत पंढरपूर येथे राहात असताना, अर्जदार क्र.१ ने जाबदार क्र.१ च्या चारित्र्यावर संशय घेवून भांडणे काढून अर्जदार क्र.१ ही पुणे येथे नोकरीसाठी परस्पर निघून गेली. अर्जदार क्र.१ ही पुणे येथे १५ दिवस राहिल्यानंतर, माहेरी वाटेगांव येथे आई–वडिलांकडे गेली. तेव्हा जाबदार क्र.१ व त्याचे आई–वडील व बार्शी येथील नातेवाईक अर्जदार क्र.१ च्या माहेरी गेले व अर्जदार क्र.१ ला समजावून सांगून तिला जाबदार क्र.१ कडे नांदण्यास घेवून आले. लग्न झाल्यापासून अर्जदार क्र.१ ही किरकोळ कारणावरुन जाबदार क्र.१ सोबत भांडणे करुन परस्पर माहेरी जात असे. जाबदारांचे पुढे असे कथन की, नोव्हेंबर, २०२२ पासून अर्जदार क्र.१ ही सोलापूर येथील राहूल लामकाने (पाटील) याचे मोबाईल नंबर ९१३७३०००६६८ वर स्टार मेकर ॲपवरुन रात्री अपरात्री तासंतास चॅटिंग करायची. त्याबाबत, अर्जदार क्र.१ कडे विचारणा केली असता, 'तो केवळ

DEVIDAS HARI KELUSKAR
Digitally signed by DEVIDAS HARI KELUSKAR
Date: 2026.03.17 17:06:54 +0530

माझा मित्र आहे, माझे त्याच्याशी इतर कोणतेही अनैतिक संबंध नाहीत' असे सांगितल्यामुळे, जाबदार क्र.१ ने अर्जदार क्र.१ हिला सुधारण्याची एक संधी दिली. परंतु, दिनांक ०१/०१/२०२३ रोजी जाबदार क्र.१ ने अर्जदार क्र.१ ला क्रॉकरी व लेडीज वेअरचे नवीन दुकान (शॉपी) घालून दिले . परंतु, त्याच दिवशी रात्री १०.०० वा.च्या सुमारास अर्जदार क्र.१ ने जाबदार क्र.१ सोबत भांडण काढले व 'यापुढे माझा तुमच्याशी कोणताही संबंध राहणार नाही, मी व माझा मुलगा नेहान तुमचेपासून वेगळे राहणार आहे, आम्हाला जगायला नवीन दुकान साधन झालेले आहे, तुम्ही तुमचे बघून घ्या' असे म्हणून मुलासह त्याच फ्लॅटमध्ये दुसऱ्या बेडरुममध्ये वेगळे राहू लागली. त्यानंतर ती काही दिवस सदर फलॅटमध्ये राहिली व काही दिवस तिच्या माहेरी जावून राहू लागली. त्यानंतर, दि. ३०/०४/२०२३ रोजी पुन्हा जाबदार क्र. १ यांचे कॉलेजमध्ये येऊन त्यांचेशी भांडण केले व त्यांना त्यांची नोकरी घालविण्याची धमकी दिली. दि. १३/०५/२०२३ ते दि. १६/०५/२०२३ रोजी इंदापूर येथील त्यांचे नातेवाईकांना टेम्पो घेऊन पंढरपूर येथील घरातील सर्व भांडीकुंडी, फर्निचर, कपडेलत्ते व इतर सामान टेम्पोत भरुन पाठवून दिले. त्यावेळीपासून अर्जदार क्र. १ सोलापूर येथे राहुल या मुलाच्या संपर्कात राहू लागली. जाबदार क्र. १ याने अर्जदार क्र. १ ची अनेक ठिकाणी चौकशी केली. परंतु, अर्जदार क्र. १ चा पत्ता मिळून आला नाही. अर्जदार क्र. १ हिने अर्जदार क्र. २ ला इस्लामपूर येथे बोर्डींगला ठेऊन स्वतः दुसरीकडे रहात आहे. अर्जदार क्र.१ हिने जाणीपूर्वक जाबदार क्र.१ यांचा लग्न झालेपासून शारिरीक, मानसिक त्रास दिला आहे. तसेच आत्महत्या करण्याची धमकीही देवू लागली. अर्जदार क्र.१

हिने स्वतःहून जाबदार क्र. १ चा त्याग केलेला आहे. तसेच, वैवाहिक जीवनातील सुखापासून जाणीवपूर्वक वंचित ठेवले आहे. तसेच तिने अर्जदारसोबत नांदायचे नाही असे महिला तक्रार निवारण यांचेकडे लेखी कळविले आहे.

४. जाबदार क्र. १ हा झालेल्या सर्व गोष्टी विसरुन अर्जदार क्र. १ बरोबर व अर्जदार क्र. २ नेहान याचे भविष्याचा विचार करुन एकत्र राहून संसार व सांभाळ करण्यास तयार होते व आहेत. त्यासाठी त्यांनी अर्जदार हि नांदण्यासाठी यावी म्हणून नोटीस पाठविली व बार्शी येथील न्यायालयात अर्ज दाखल केलेला आहे. परंतु, अर्जदार ही कोणत्याही कारणाशिवाय नांदायला येण्यास तयार नाही. म्हणून सदरचा अर्ज खर्चासह नामंजूर करण्यात यावा अशी विनंती केली आहे.

५. खालील न्यायालयाने अर्जदार हि नोकरी करते व कमवते त्यामुळे तिला पोटगी देण्याची आवश्यकता नाही असा निष्कर्ष नोंदवून अंतरिम अर्ज फेटाळला आहे. त्याविरुध्द अर्जदार हिने प्रस्तुतचे अपील दाखल केले आहे.

६. अपीलार्थीतर्फे वकील व सामनेवालातर्फे वकील यांचा युक्तीवाद ऐकला. खालील न्यायालयाच्या आदेशाचे अवलोकन केले. खालील मुद्दे उपस्थित झाले असून त्यांचे निष्कर्ष त्यांच्यासमोर खालील दिलेल्या

DEVIDAS HARI KELUSKAR
Digitally signed by DEVIDAS HARI KELUSKAR
Date: 2026.03.17 17:07:03 +0530

कारणामीमांसाप्रमाणे नोंदविलेले आहेत.

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १ | खालील न्यायालयाने पारीत केलेल्या आदेशात हस्तक्षेप करण्याची आवश्यकता आहे काय ? | होय. |
| २ | आदेश काय ? | अर्ज अंशतः मंजूर करण्यात आला. |

**कारणमिमांसा**

**मुद्दा क्रमांकः १ बाबतः**

७. अर्जदार व सामनेवालातर्फे वकीलांनी अर्जदार व जाबदार यांच्या कथनाप्रमाणे युक्तीवाद केला. अर्जदाराच्या कथनांनुसार खालील न्यायालयाने अर्जदार क्र. २ याच्या शिक्षणाच्या व पालनपोषणाच्या खर्चाबाबत कोणताही विचार केलेला नाही. तसेच अर्जदाराच्या उत्पन्नाबाबत कोणताही ठोस पुरावा नसताना केवळ जाबादाराच्या कथनानुसार तिला दरमहा रुपये २५,०००/- इतका पगार आहे असे गृहीत धरुन तिचा पोटगीचा अर्ज नाकारला. खालील न्यायालयाने अर्जदार क्र. २ बाबत कोणताही विचार केलेला नाही त्यामुळे अपीलात हस्तेक्षप करुन अंतरिम पोटगीबाबत योग्य ते आदेश करण्याची विनंती केली.

८. जाबदारतर्फे वकीलांनी कथन केले की, अर्जदार हि उच्चशिक्षीत असून ती पुर्वीपासून नोकरी करीत होती. तिने स्वतःहून जाबदाराचा त्याग

केला आहे व तिला स्वतंत्र उत्पन्नाचे साधन आहे. जाबदार यास पंढरपूर येथे घेतलेला फलॅटच्या कर्जाचे हप्ते भरावे लागतात. त्यामुळे अर्जदार कोणतीही पोटगी मिळणेस पात्र नाही. त्यांनी अपील फेटाळण्याची विनंती केली.

९. अर्जदार व जाबदार क्र. १ यांचा विवाह सन २०११ साली झाला व सदर लग्नसंबंधातून अर्जदार क्र. १ हिने अर्जदार क्र. २ यास जन्म दिला आहे. सन २०२३ पासून अर्जदार तिच्या मुलासह आपल्या आईवडीलांसोबत राहत आहे. अर्जदार हिने केलेल्या कथनानुसार तिचा छळ झाला किंवा नाही, तसेच अर्जदार क्र. १ हिने जाबदाराचा स्वतःहून त्याग केला आहे किंवा नाही हे पुराव्यांती मुळ अर्जाच्या निकालावेळी ठरणार आहे. अर्जदार हिने अर्जासोबत दाखल केलेल्या शपथपत्रात ती नोकरी करुन तिला दरमहा रुपये १२,०००/– इतके उत्पन्न मिळत असल्याचे कथन केले आहे. अर्जदार हि स्वतःहून जाबदार याचा त्याग करुन निघून गेली किंवा नाही व तिचा शारिरीक व मानसिक छळ झाला किंवा नाही याबाबी पुराव्यांती ठरणार आहेत. त्यामुळे तुर्तास तिला अंतरिम पोटगी देण्याबाबत आदेश करणे योग्य होणार नाही.

१०. सद्यस्थितीत अर्जदार ही तिच्या १० वर्षाच्या मुलासोबत आईवडीलांसोबत राहत आहे. अर्जदार हिने तिचा मुलगा नेमके कोठे शिक्षण घेत आहे व त्याच्या खर्चाबाबत कथन केलेले नाही. परंतु, अर्जदार क्र. २ याचे शिक्षण व पालनपोषणाची जबाबदारी अर्जदार व जाबदार या दोघांची आहे.

DEVIDAS HARI KELUSKAR

Digitally signed by DEVIDAS HARI KELUSKAR
Date: 2026.03.17 17:07:11 +0530

जाबदार हा शिक्षक म्हणून नोकरी करीत आहे व आपल्या मुलाची जबाबदारी पेलण्यास तो अर्थिकदृष्टया सक्षम आहे. अर्जदार क्र. २ याचे वय लक्षात घेऊन व तो शिक्षण घेत असल्याने, अर्जदार हिने मागणी केल्याप्रमाणे अर्जदार क्र. २ याच्या पालनपोषणासाठी व शिक्षणासाठी म्हणून दरमहा रुपये ५,०००/– जाबदार क्र. १ याने देण्याबाबत आदेश करणे उचित ठरेल. वरील कारणाकरिता खालील न्यायालयाच्या आदेशात हस्तक्षेप करण्याची आवश्यकता आहे. त्यामुळे मुद्दा क्र.१ चा निष्कर्ष होकारार्थी देण्यात येत आहे व मुद्दा क्र.२ करीता खालील आदेश पारीत करीत आहे.

## आ दे श

| | |
|---|---|
| १) | अपील अंशतः मंजूर करण्यात येते. |
| २) | जाबदार क्र.१ यास आदेश देण्यात येतो की, त्याने खालील न्यायालयात अंतरिम पोटगीचा अर्ज दाखल तारखेपासून अर्जदार क्र. २ याचेकरिता अंतरिम पोटगी म्हणून दरमहा र.रु.५,०००/– मुळ अर्जाचा अंतिम निकाल लागेपर्यंत द्यावेत. |
| ३) | खर्चाबाबत आदेश नाही. |
| | (खुल्या न्यायालयात अधिघोषीत केला) |

DEVIDAS HARI KELUSKAR
Digitally signed by DEVIDAS HARI KELUSKAR
Date: 2026.03.17 17:07:19 +0530

सांगली (देविदास हरी केळूसकर)
दिनांकः १७.०३.२०२६ अतिरिक्त सत्र न्यायाधीश, इस्लामपूर.